बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०३ । अंक – १६० वा । वार बुधवार दि २५ मार्च २०२६ आरएनआय एमएचएमएआर /२०२३/८३९६५ । पोस्टल नं. एल.एस.बी/बीड आर.एन.पी–२६६/२०२६–२०२८ । किंमत ३ रू. । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 03 Issue - 160 wenesday 25 MARCH 2026 - RNI : MAHMAR/2023/83965 -Postal No. L S.B/Beed / RNP-266/2026-2028 Price - 3 Rupees Pages 4

## आमदार म्हणून प्रकाश सोळंके तहसीलदार रूईकर आणि एसडीओ इंगोले यांना अवैध वाळू उपसा प्रकरणी २०० कोटींचा हिशोब विचारणार आहात का?

# आ.प्रकाश सोळंके जातीय द्वेषाशातून बाहेर कधी येणार? स्वत: च्या पुतण्यासह माफिया कार्यकर्त्यांचे वाळू टेंडर अवैधरित्या चालवण्यासाठी पीआय राहुल सूर्यतळ यांची बदली करण्याचा डाव का?

सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक :- दिपक थोरात मो.९८६०८९८५६४

### टेंडर पार्टनरशिपवरून आमदारांवर सवाल?

माजलगाव मतदारसंघात वाळू टेंडर आणि त्यातील कथित भागीदारीवरून आमदार प्रकाश सोळंके यांच्यावर सवाल उपस्थित केले जात आहेत. माजलगावमधील एकूण टेंडरमध्ये तुमची नेमकी भागीदारी किती? तसेच गंगामसला येथील टेंडर नेमके कोणाच्या ताब्यात आहे? असे प्रश्न स्थानिक पातळीवरून विचारले जात आहेत.

दरम्यान, विधानसभेत पोलिसांविरोधात भूमिका मांडण्यापूर्वी या मुद्द्यांवर स्पष्टता द्यावी, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे. वाळू टेंडर, ओव्हरलोड वाहतूक आणि संबंधित व्यवहारांवरून निर्माण झालेल्या वादामुळे राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या कारवाईनंतरच हे प्रश्न पुढे येत असल्याची चर्चा असून, संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. एकूणच, टेंडर व्यवहार आणि राजकीय हस्तक्षेप या मुद्द्यांमुळे माजलगावमध्ये नव्या वादाला तोंड फुटले असून, संबंधितांकडून अधिकृत स्पष्टीकरणाची प्रतीक्षा व्यक्त केली जात आहे.

# आ. सोळंके माजलगाव मतदारसंघातील प्रश्न विधानसभेत मांडण्यासाठी जनतेने तुम्हाला आमदार केले का निरपराध, कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची बदली करण्यासाठी?

## अहो.. प्रकाश दादा माजलगावच्या एकूण टेंडर मध्ये तुमची पार्टनरशिप किती आहे व गंगामसल्याचे टेंडर कोणाचे आहे हे अगोदर सांगा ना विधानसभेमध्ये पोलिसाच्या विरोधात काय बोलताय?

### राहुल सूर्यतळ हे लाच प्रकरणात निर्दोषच असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले



**माजलगाव आरंभ वृत्तसेवा**

माजलगाव मतदारसंघात पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या बदलीच्या मागणीवरून राजकीय वातावरण तापले आहे. अवैध वाळू उपसा आणि दोन नंबरच्या धंद्यांवर पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे हा वाद निर्माण झाल्याची चर्चा स्थानिक पातळीवर रंगत आहे. माजलगाव शहर व परिसरात अवैध वाळू वाहतूक आणि इतर बेकायदेशीर व्यवहारांवर राहुल सूर्यतळ यांनी कठोर कारवाई केल्याचे सांगितले जाते. या कारवायांमुळे काही राजकीय कार्यकर्त्यांचे हितसंबंध बाधित झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार सोळंके यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित करत संबंधित अधिकाऱ्यांच्या बदलीची मागणी केली.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत संबंधित लाच प्रकरणात पोलीस निरीक्षक सूर्यतळ हे निर्दोष असल्याचे स्पष्ट केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे बदलीच्या मागणीमागील कारणांबाबत शंका उपस्थित होत आहेत. या प्रकरणात शिवसेना (शिंदे गट) आमदार अर्जुन खोतकर तसेच काँग्रेस नेते नाना पटोले यांनीही भूमिका घेतल्याने वाद अधिकच चिघळला आहे.

गंगामसला परिसरातील वाळू टेंडर, ओव्हरलोड वाहतूक आणि अवैध व्यवहारांवर झालेल्या कारवायांमुळे काही प्रभावशाली गट नाराज असून, त्यातूनच अधिकाऱ्यांवर दबाव टाकला जात असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणात जातीय द्वेषाचा मुद्दा पुढे येत असल्याने वातावरण अधिक संवेदनशील बनले आहे.

अगोदर प्रकाश सोळंके यांनी सांगाव की गंगामसला येथील टेंडर पुतण्याचे आहे का नाही कार्यकर्त्यांसह स्वतःचे वाळूचे माफिया पोसण्याचे काम प्रकाश सोळंकेंकडून होत आहे. दोन नंबर व वाळू माफियांवर माजलगाव शहर पोलीस ठाणे चे प्रमुख राहुल सूर्यतळ यांनी कारवाया केल्या. त्यामुळे राजकीय द्वेष व जातीय द्वेष प्रकाश सोळंके यांच्याकडून पाहायला मिळत आहे राहुल सूर्यतळ यांनी प्रकाश सोळंके यांच्या कार्यकर्त्यांच्या दोन नंबर वर कारवाया केल्यानंतर प्रकाश सोळंके यांना आली जाग. विधानसभेमध्ये राहुल सूर्य तळ यांच्या बदलीसाठी आटापिटा करत आहेत परंतु प्रकाश सोळंके यांनी सागावकी गंगामसल्याचे टेंडरच्या ओव्हरलोड गाड्या व वाळू माफियांचं दोन नंबरच्या धंद्यांवरती माजलगाव पोलिसांनी केलेली कारवाई प्रकाश सोळंकेचे पोलीस प्रशासन ऐकत नसल्यामुळे चांगले अधिकारी यांच्या बदलीचा डाव आमदार प्रकाश सोळंके आमदार अर्जुन खोतकर नाना पटोले यांनी आखला आहे.

पण अधिकारी हा कुठल्याही जाती धर्माचा नसतो परंतु आमदार प्रकाश सोळंके यांना पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ पान २ वर...

### माजलगावकरांचा सूर्यतळ यांना पाठिंबा, बदली रोखण्यासाठी एसपी नवनीत काँवत यांच्याकडे अनेक निवेदने







### अवैध धंदे सुरळीत चालवण्यासाठी प्रकाश सोळंके यांची केविलवाणी धडपड धडपड?

माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक राहुल सूर्यतळ हे लाच प्रकरणात निर्दोष असल्याचे विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केल्याने बदलीच्या मागणीवरून सुरू असलेल्या वादाला नवे वळण मिळाले आहे. दरम्यान, शहरातील अवैध धंद्यांवर कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांची बदली करण्यासाठी आमदार प्रकाश सोळंके प्रयत्न करत असल्याचा आरोप स्थानिक पातळीवरून केला जात आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. माजलगावकरांनी राहुल सूर्यतळ यांना पाठिंबा दर्शवत त्यांच्या बदलीला विरोध केला आहे. बदली रोखण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कावत यांच्याकडे अनेक निवेदने देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याला बदली करून अवैध धंद्यांना मोकळीक देण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा शहरात रंगत असून, या प्रकरणामुळे माजलगावातील राजकीय वातावरण तापले आहे.

## तीन अल्पवयीन मुलींचा शोध व घरवापसी बीड शहर पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी



बीड (आरंभ वृत्तसेवा):- मागील दोन महिन्यांच्या कालावधीत घरातून निघून गेलेल्या तीन अल्पवयीन मुलींचा शोध घेऊन त्यांचे समुपदेशन करून सुरक्षितपणे घरी परत पाठवण्यात बीड शहर पोलिसांना यश आले आहे. यातील तिसऱ्या मुलीचा शोध नांदेड शहरातून घेण्यात आला. विशेष बाब म्हणजे संबंधित मुलगी स्वतः मोबाईल वापरत नव्हती, त्यामुळे तिचा मागोवा घेणे अत्यंत आव्हानात्मक ठरले. मात्र, एका अनोळखी व्यक्तीचा मोबाईल वापरून तिने इंस्टाग्रामवरून पान २ वर...

## गुटका व पानमसाल्याची चोरून विक्री करताना एक जण जेरबंद, १ लाख १८ हजाराचा मुद्देमाल जप्त

केज (आरंभ वृत्तसेवा):- केज तालुक्यातील कुंबेफळ, धनेगाव व सारणी आनंदगाव परिसरात राज्य शासनाने बंदी घातलेल्या गुटखा व पान मसाल्याची स्कुटी वरून चोरून विक्री करताना शेख सादेक अब्दुल समद रा.केज यास जेरबंद करून त्याच्या ताब्यातील स्कुटी सह, गुटखा, पान मसाला मिळून एकूण १ लाख १८ हजाराचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. केज येथील शेख सादेक अब्दुल समद रा. केज हा आपल्या स्कुटी वरून केज तालुक्यातील कुंबेफळ, धनेगाव, सारणी आनंदगाव परिसरातील खेडेगावातील किराणा दुकान व पानटपरी चालकांना राज्यशासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व पानमसाल्याची चोरून विक्री करीत होता. रविवारी दुपारी सारणी पान २ वर...



## बीड पोलिस - अपघातग्रस्तांना तात्काळ मदतीसाठी हाय-एंड टॅब्सचे वितरण

बीड (आरंभ वृत्तसेवा):- बीड जिल्हा पोलिस दलाकडून अपघातग्रस्तांना तात्काळ मदत मिळावी तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध अपघातसंबंधी मदत व विमा योजनांचा लाभ जलद गतीने मिळावा, या साठी राज्य शासनामार्फत देण्यात आलेले हाय एन्ड टॅब्स वितरित करण्यात आले.

अपघातातील जखमी व मृतांच्या कुटुंबीयांना Prime Minister's National Relief Fund (प्रधानमंत्री राहत निधी) तसेच इतर केंद्र




शासनाच्या अपघात विमा योजनांचा लाभ वेळेत मिळण्यासाठी, अपघाताची अचूक व तत्काळ नोंद होणे अत्यावश्यक असते. यासाठी Integrated Road - ccident Database (IR-D) Am{U e-Detailed पान २ वर...

# योगेश्वरी ग्रीन आर्मीच्या वतीने हर घर शेंदूर अभियानाचा शहीद दिनी शुभारंभ

अंबाजोगाई– आरंभ वृत्तसेवा

एक पेड शहीदो के नाम या अभियांतर्गत शेंदूर वृक्षांच्या एक लाख बिया वाटप करून हर घर शेंदूर हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. हैदराबाद मुक्तिसंग्राम अमृत महोत्सवी वर्षात ७५ शहीद माता, माजी सैनिक, सैनिक, मंदिरे यासमोर ७५ शेंद्राची वृक्ष लागवड केली. त्याचवेळी एस आर टी महाविद्यालयाच्या परिसरात दहा वृक्ष शेंद्राची लावली या वृक्षाचे पुनर्जीवन करण्यासाठी शहीद दिनी हर घर शेंदूर अभियानाची सुरुवात केली. शहीद माता व सैन्य दलात कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या हस्ते जवळपास एक लाख शेंदूर बिया वाटप करण्यात आल्या पावसाळ्याच्या काळात शेंदूर वृक्षाचे पुनर्जीवन करण्यासाठी २३ मार्च ते ५ जून पर्यंत एक लाख बिया वाटप करण्यात येणार आहेत. ग्रीन आर्मीच्यावतीनेही ऑपरेशन हर घर शेंदूर सुरू करण्यात आले आहे. योगेश्वरी सैनिक स्कूलमध्ये बिया ठेवण्यात आले आहेत. ज्यांना वृक्ष लागवडीसाठी पाहिजे असतील त्यांनी ते योगेश्वरी सैनिक स्कूल मधून घेऊन जावीत असे आवाहन प्राचार्य मेजर एस.पी. कुलकर्णी केले आहे.

# बीड जिल्हयात चाऱ्या घरफोड्या करणारे ०३ गुन्हेगारांना पोलीस अधिक्षकांनी केले तीन जिल्हयातुन हद्दपार.

बीड (आरंभ वृत्तसेवा) जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी बीड जिल्हयाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर बीड जिल्हयात होत असलेल्या चोऱ्या, घरफोड्या, खुन व खुनाचा प्रयत्न, दंगा, जबरी चोऱ्या, दरोडा टाकणारे गुन्हेगारांना प्रतिबंध करुन शांतता प्रस्थापित करण्यासाठी बीड पोलीस दलाकडुन विशेष मोहिम राबविण्यात येत आहे त्यासाठी बीड जिल्हयातील गुन्हेगारावर बीड पोलीसांची पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांच्या सुचनेवरुन करडी नजर आहे. असे गंभीर गुन्हे करणारे गुन्हेगारांच्या टोळयावर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी त्यांचे विरुध्द जास्तीत जास्त उचित प्रतिबंधक कारवाया करणे बाबत पो.स्टे. प्रभारी अधिकाऱ्यांना सुचना दिलेल्या आहेत.

पो.स्टे. प्रभारी अधिकारी पेठ बीड श्री. मारोती खेडकर यांनी बीड जिल्हयात टोळीने गुन्हे करणारे इसम १. भिमा लक्ष्मण मस्के वय–४४ वर्षे रा.वतारवेस पेठ बीड ता.जि.बीड (टोळी प्रमुख) २. अविनाश कल्याण धुरधरे वय–३८ वर्षे रा. मादळमोही ता. गेवराई जि.बीड






ह.मु.काळा हनुमान ठाणा चांदणेवस्ती पेठ बीड ता.जि.बीड (टोळी सदस्य) ३. विपुल उत्तम गायकवाड वय–४२ वर्ष रा. नागोबा गल्ली चांदणे वस्ती पेठ बीड ता.जि.बीड (टोळी सदस्य) यांचे टोळीवर मालाविरुध्दचे गंभीर गुन्हे, चोरी करणे, दिवसा व रात्री घरफोडी करणे, टॉवरच्या बॅट–या चो–या करणे, कॉपर वायर चोरणे असे गुन्हे दाखल असल्याने व त्यांची जनतेमध्ये दहशत निर्माण सर्वसामन्य लोकांच्या जंगम मालमत्तेस धोका होत असल्याने सदर टोळीच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी व सदर टोळीची पांगा पांग करण्यासाठी त्यांचे टोळी विरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे दि.०४.०२.२०२६ रोजी हद्दपार प्रस्ताव पोलीस अधिक्षक कार्यालयास सादर केला होता. सदर प्रस्तावाची उप विभागीय पोलीस अधिकारी बीड यांनी चौकशी पूर्ण केल्या नंतर पोलीस अधीक्षक बीड यांनी त्यांना दि. १३.०३.२०२६ व दि.२४.०३.२०२६ रोजी त्यांचे म्हणने मांडण्यास संधी दिली असता ते गैरहजर राहीले व त्यांचे टोळीवरील गुन्हे, लोकांमधील दहशत, त्यांची गुन्हेगारी पार्श्वभुमी पाहुन, गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी व सदर टोळीची पांगा–पांग करणे साठी सदर टोळीस बीड, लातुर, धाराशिव जिल्हयाचे कार्यक्षेत्रातुन महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे दोन वर्षे कालावधीसाठी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी आज दि.२५.०३.२०२६ रोजी आदेश पारीत करुन हद्दपार केले आहे. सदरची कामगिरी श्री. नवनीत काँवत पोलीस अधीक्षक, बीड अपर पोलीस अधिक्षक, बीड श्री. सचिन पांडकर, उप विभागीय पोलीस अधिकारी श्रीमती. पुजा पवार पोनि श्री. शिवाजी बंटेवाड स्था.गु.शा.बीड यांच्या मार्गदर्शनाखालील पोलीस निरीक्षक श्री. मारोती खेडकर, पोह/सुभाष मोटे, पोह/नितीन राठोड सर्व पोस्टे पेठ बीड सपोउपनि–अभिमन्यु औताडे, पोशि बिबिसेन चव्हाण पोशि/आलिम शेख यांनी केली आहे. भविष्यातही बीड जिल्हयात टोळीने गुन्हे करणारे गुन्हेगांरा विरुध्द व गुंडा विरुध्द कठोर भुमीका घेवुन चझऊ–, चउजउ– तसेच हद्दपार अशा कारवाया करण्याचे संकेत पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी दिले आहेत.

पान १ वरून..

**आ. सोळंके माजलगाव मतदारसंघातील प्रश्न विधानसभेत मांडण्यासाठी जनतेने तुम्हाला आमदार केले का निरपराध, कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची बदली करण्यासाठी?**

यांच्यामध्ये दलित दिसल्यामुळे त्यांच्या बदली ची मागणीचा द्वेष त्यांच्या मनात कदाचित आले असल्याची चर्चा माजलगाव मतदार संघामध्ये सध्या नागरिकांच्या तोंडून ऐकायला मिळत आहे. आमदार प्रकाश सोळंके यांना उशिरा सुचलेला शहाणपणा माजलगाव शहर पोलीस ठाणे अमोल कदम या पोलीस कर्मचाऱ्याला लाच घेताना पकडण्यात आले होते. त्या प्रकरणी अकलेचे तारे तोडत आमदार प्रकाश सोळंके यांनी पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या बदलीची मागणी केली आहे. तर बीड जिल्ह्यातील पोलीस प्रशासनाच्या एलसीबी सह अन्य वसुली करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असल्याबाबत शिवसेना शिंदे गटाचे आमदार अर्जुन खोतकर व राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचे आमदार नाना पटोले यांनी प्रकाश सोळुंके यांची साथ आपल्या समाजाचा अधिकारी त्या ठिकाणी आणून आपली काम करून घ्यायची आपले कार्यकर्ते वाळूमाफिया व दोन नंबर वाले पोसण्यासाठी प्रकाश सोळंके यांनी हा आटापिटा लावलेला आहे राहुल सूर्य तळ हे सिंघम पोलीस अधिकारी आहेत त्यांची बदली करून स्वतःचा माफीया कार्यकर्ता पोहोचण्याचं काम प्रकाश सोळुंकेकडून यांच्याकडून होत असल्याची चर्चा माजलगाव मतदारसंघात होत आहे.

------------------

**तीन अल्पवयीन मुलींचा शोध व घरवापसी बीड शहर पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी**

एका मित्राला संदेश पाठवला होता. त्या मित्रालाही तिची ओळख नव्हती, त्यामुळे तपास अधिक गुंतागुंतीचा झाला. सदर संदेशात तिने नांदेड येथे असल्याचे संकेत दिले होते. त्यानुसार नांदेड पोलिसांची मदत घेऊन शोधमोहीम राबविण्यात आली. स्थानिक माहितीदारांच्या मदतीने ती एका विद्यार्थिनीच्या रूमवर राहत असल्याची माहिती मिळाली आणि पोलिसांनी तत्काळ कारवाई करून मुलीला ताब्यात घेतले. मुलगी शोधल्यानंतर तिचे कुटुंबाशी पुनर्मिलन करून घरी परत पाठवणे हे आणखी मोठे आव्हान असते. अनेक वेळा मुली घरच्यांविरुद्ध बंड करून शासकीय वसतिगृहात राहण्याचा पर्याय निवडतात. अशा वेळी पोलिस आणि बालकल्याण विभाग यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. बीड शहर पोलिसांनी प्रभावी समुपदेशन व समन्वय साधून तीनही मुलींची यशस्वी घरवापसी केली आहे. तपासादरम्यान असे निदर्शनास आले की, किशोरवयीन मुलींसोबत पालकांनी संवाद साधताना समजून घेण्याऐवजी कठोर भूमिका घेतली जाते. योग्य संवादाचा अभाव, तसेच सोशल मीडियाचा प्रभाव यामुळे मुली घरापासून दूर जाण्याची शक्यता वाढते. याबाबत पालकांनी सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, पोलीस अंमलदार गहिनीनाथ बावनकर, मंगेश शिंदे, राम पवार यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

------------------

**गुटका व पानमसाल्याची चोरून विक्री करताना एक जण जेरबंद,१**

फाट्यावर गुटखा व पान मसाल्याची चोरून विक्री करीत असताना त्याला युसूफवडगाव पोलिसांनी ताब्यात घेवून पोलीस धनंजय कारले यांच्या फिर्यादीवरून शेख सादेक अब्दुल समद रा. केज याच्या विरुद्ध युसूफवडगाव पोलिसात गून्हा नोंद करण्यात आला.पोलीस निरीक्षक. मच्छिन्द्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार अनिल बिक्कड हे पुढील तपास करीत आहेत.

दोन दिवसाची पोलीस कोठडी

या प्रकरणातील आरोपी शेख सादेक अब्दुल समद रा केज यास सोमवारी दि.२४ मार्च रोजी केज न्यायालया समोर हजर केले आसता त्याला दि. २५ मार्च पर्यंत दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे न्यायालयाने आदेश दिले आहेत.

----------------

**बीड पोलिस - अपघातग्रस्तांना तात्काळ मदतीसाठी हाय-एंड टॅब्सचे वितरण**

-ccident Report (e-D-R) या प्रणालींमध्ये माहिती त्वरित भरणे गरजेचे आहे. याच पार्श्वभूमीवर, बीड जिल्ह्यातील प्रत्येक पोलिस ठाण्यासाठी २ हाय–एंड टॅब्सचे वितरण करण्यात आले आहे. या टॅब्सच्या माध्यमातून अपघातासंबंधी माहिती घटनास्थळीच त्वरीत खठ–ऊव श–ऊ–ठ प्रणालीमध्ये नोंदवता येणार असून, त्यामुळे अपघातग्रस्तांना शासकीय मदत व विमा दावे लवकर मंजूर होण्यास मदत होणार आहे. मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कांवत यांच्या हस्ते हे टॅब्स संबंधित पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना वितरित करण्यात आले. यावेळी अपर पोलीस अधीक्षक बीड श्री. सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई सौ. चेतना तिडके, सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी, जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी तसेच जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी अधिकारी एपीआय सानप उपस्थित होते. या उपक्रमामुळे अपघाताची माहिती अधिक अचूक, पारदर्शक व वेळेत नोंदवली जाईल आणि नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ जलद गतीने मिळेल. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नागरिकांना अधिक स्मार्ट, जलद व पारदर्शक सेवा देण्यासाठी बीड पोलिस कटिबद्ध असल्याची ग्वाही मा. पोलीस अधीक्षक यांनी यावेळी दिली.

# अमोल धन्वे यांची युवा रिपाइंच्या बीड शहर सचिवपदी निवड

## पप्पू कागदे यांच्या हस्ते दिले नियुक्तीपत्र




बीड (आरंभ वृत्तसेवा):– रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून विविध चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवून चळवळीत काम करणारे भीमराज नगर राजुरीवेस बीड येथील धडाडीचे युवक कार्यकर्ते अमोल अशोकराव धन्वे यांच्या कामाची दखल घेऊन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत अमोल धन्वे यांची युवा रिपाइंच्या बीड शहर सचिव पदी निवड करण्यात आली. नवडी प्रसंगी नवनिर्वाचित युवक रिपाइंचे बीड शहर सचिव अमोल धन्वे म्हणाले की, रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांचे हात बळकट करण्यासाठी युवा रिपाइं प्रदेश अध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली बीड शहरात युवकांचे संघटन करून मजबूत पक्ष बांधणीचे काम आगामी काळात इमाने–इतबारे करणार आहे. या निवडी प्रसंगी राजू जोगदंड, अविनाश जोगदंड, शाम वीर, विलास जोगदंड, महेश कागदे, कपिल ईनकर, नाना कांबळे, बाळू सोनवणे, चिंटू वडमारे, सोनू वडमारे, बाळू सोनवणे, जितू धन्वे, राजपाल टाकणखार, बंटी वडमारे, गौतम कांबळे, प्रवीण वडमारे, विकास जोगदंड, आकाश धन्वे, राम वडमारे, जितू वडमारे, देवा वडमारे, पप्पू साळवे, अजिंक्य वडमारे, ऋषिकेश वीर, रोहित पिल्ले, राहुल साबळे, पप्पू साळवे, ऋषिकेश सोनवणे यांच्यासह शेकडो युवक कार्यकर्ते उपस्थित होते.

# बलात्कार व मारहाण प्रकरणातील आरोपीला केज न्यायालयाकडून जामीन मंजूर

केज (आरंभ वृत्तसेवा):– केज तालुक्यातील युसुफ वडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत पीडिते सोबत जबरदस्तीने मारहाण करून शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या आरोपीला केज येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला आहे. मधुकर मस्के असे या जामीन मिळालेल्या आरोपीचे नाव आहे.



प्रकरणाची पार्श्वभूमी या संदर्भात अधिक माहिती अशी की,आरोपी मधुकर मस्के याच्या विरुद्ध युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.नं.३२६/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ (इ.छ.ड.) च्या कलम ३३३,११५ (२),७५,७६,७८,७९,६४, ३५२ आणि ३५१(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. पीडितेने दिलेल्या तक्रारी नुसार,आरोपीने तिला जबरदस्तीने मारहाण करून तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप होता.या गंभीर गुन्ह्याखाली आरोपीला अटक करण्यात आली होती.न्यायालयीन प्रक्रिये मध्ये आरोपी मधुकर मस्के याने केज येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात नियमित जामीन मिळवण्यासाठी अर्ज क्र.६५/२०२६ दाखल केला होता.या अर्जावर दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्या नंतर,न्यायालयाने आरोपीला अटी व शर्तीं सह जामीन मंजूर केला. आरोपीच्या वतीने ड. डी.बी.बिक्कड आणि ड.आशिषकुमार टोपे यांनी न्यायालयात प्रभावीपणे काम पाहिले. त्यांनी मांडलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीची सुटका करण्याचे आदेश दिले आहेत.या निकाला कडे परिसरातील कायदे तज्ज्ञांचे लक्ष लागले होते.

पान ४ वरून..

**भोंदू अशोक खरात प्रकरणावरून अंधश्रद्धेविरोधात कठोर कारवाईची मागणी; 'मअंनिस' बीडचे मुख्यमंत्र्यांना निवेदन**

अत्यंत चिंताजनक असल्याचा तीव्र निषेध करण्यात आला आहे. मअंनिसने या प्रकरणाची निष्पक्ष, निर्भय व पारदर्शक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटन अधिनियम, २०१३ या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यासोबतच, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली नियमावली तातडीने पूर्ण करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. राज्यघटनेने अधोरेखित केलेल्या 'वैज्ञानिक दृष्टिकोन' मूल्यांची जपणूक करण्यासाठी शाळा, महाविद्यालये व समाजात व्यापक जनजागृती मोहीम राबवावी. तसेच, राजकीय पक्ष व नेत्यांनी भोंदू बाबा, बुवा, मांत्रिक व ज्योतिषी यांच्याशी असलेले संबंध तत्काळ तोडून विवेकी आचारसंहिता तयार करावी, अशी ठाम भूमिका मांडण्यात आली आहे. अशोक खरातसारखी प्रकरणे राज्यभर असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने सर्व जिल्हा पोलीस प्रशासनाला विशेष तपासाचे स्पष्ट निर्देश देऊन गुन्हे नोंदविण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे. या निवेदनावर मअंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे, विवेक वाहिनीच्या प्राचार्य सविता शेटे, जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य कॉ. डी. जी. तांदळे, बीड शाखा कार्याध्यक्ष प्रा. विजय घेवारे, विधिज्ञ कॉ. करुणा टाकसाळ, रामधन जमाले (इंटक) प्रतिक राऊत, आदित्य वीर, नितीन रांजवण, अनिता जोगदंड, मीरा डोईफोडे, बाजीराव ढाकणे, शुभांगी कुलकर्णी, कौशल्या बावने, राणी कातखेडे, डॉ. संजय तांदळे, प्रवीण सोनवणे, शेख अमर पाशा, किरण घाडगे, रुक्मिणी नागापुरे, तेजस्विनी भाटे, रणजित माने आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

------------------

**बीड शहरात शांततेचा संदेश; रामनवमी व आंबेडकर जयंती पार्श्वभूमीवर शांतता समितीची महत्त्वपूर्ण बैठक**

कर्मचारी देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शांतता समितीचे मुसा खान पठाण, डॉ.इलियास खान, शेषराव तांबे, बाळासाहेब घुमरे, दत्ता पडळकर, अंकुश चव्हाण, मंगेश लोडगे, हनुवते तसेच पत्रकार पठाण अमरजान यांची उपस्थिती होती. बैठकीत सर्व धर्मीय सण एकोप्याने आणि शांततेत साजरे करण्याचे आवाहन करण्यात आले असून, कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याचेही नागरिकांना सूचना देण्यात आले.

--------------------

**धारूरच्या मुख्य मेन रोडवर फळ विक्रेते हातगाड्यानी केले अतिक्रमण ; वाहतुकीला अडथळा**

संबंधित बेकायदेशीर अतिक्रमणधारकांना सूचना करून मुख्य रोडवरील गाडे न लावण्याचे सूचना द्यावेत व शहरवासीयांना मोकळा श्वास भेटेल अशी सोय करावी अशी मागणी नागरिकांतून होऊ लागली आहे.

काही ठराविक व्यापाऱ्यांच्या चार चाकी वाहने २४ तास रस्त्यावर..

शहरात मोठ्या प्रमाणात दिवसेंदिवस वाहतूक कोंडी होऊ लागली असून यात हातगाडे फळ विक्रेत्यांनकडून अतिक्रमणचा सपाटा तर काही ठराविक व्यापाऱ्यांकडून दुकानासमोर चार चाकी वाहने मुख्य रोडवर २४ तास उभ्या करतात त्यामुळे वाहतुकीला अडथळा अधिकच निर्माण होत आहे तसेच उभ्या केलेल्या गाड्यांमुळे अपघात होऊ लागले आहेत तरी संबंधित नियमबाह्य वाहन धारणकांवर कारवाई करण्याची गरज आहे.

==================

------------------

**बीड जिल्ह्यात सुट्या स्वरूपात पेट्रोल-डिझेल विक्रीवर बंदी**

खालील बाबी स्पष्ट केल्या आहेत: कोणत्याही ग्राहकाला बाटली किंवा कॅनमध्ये पेट्रोल–डिझेल देऊ नये. केवळ वाहनांच्या टाकीतच इंधन भरून देण्याचे निर्देश दिले आहेत. जर एखाद्या पेट्रोल पंपावर या नियमाचे उल्लंघन होत असल्याचे आढळल्यास, संबंधित चालकावर शासकीय नियमांनुसार कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. हे आदेश जिल्ह्यातील सर्व तहसीलदार आणि पेट्रोल पंप चालकांना तात्काळ अंमलबजावणीसाठी लागू करण्यात आले आहेत. नागरिकांनी घाबरून न जाता सहकार्य करावे आणि इंधनाचा अनावश्यक साठा करू नये, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

------------------

**देशी दारू दुकानावर बळजबरीने ताबा - जीवे मारण्याच्या धमक्या**

मजुरीसाठी बाहेरगावी जात असल्याचा गैरफायदा घेत, धारूर येथील धीरज विष्णू कोमटवार (वय ३९) याने कपटपूर्वक व बळजबरीने दुकान आणि संबंधित मालमत्तेवर ताबा मिळविल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, संबंधित व्यक्तीने उङ–खखख परवाना स्वतःच्या नावावर करून घेतला असून दुकानाची जागा, ठउउ बांधकाम, सुमारे १० लाख रुपयांचा देशी दारूचा साठा तसेच व्यवसायासाठी लागणाऱ्या सर्व वस्तू बेकायदेशीररीत्या ताब्यात घेतल्या आहेत. विशेष म्हणजे, सदर व्यक्तीस ५–६ वर्षांपूर्वी कामगार म्हणून ठेवण्यात आले होते, मात्र त्याने विश्वासघात करून संपूर्ण मालमत्ता बळकावल्याचे सांगण्यात आले आहे. याशिवाय, या प्रकरणाबाबत जाब विचारला असता संबंधित आरोपीने तक्रारदार व त्यांच्या वृद्ध आईस जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. तसेच खोटे गुन्हे दाखल करून त्रास देण्याचाही प्रयत्न केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या घटनेमुळे केज तालुक्यात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, माजी सैनिकांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे. तक्रारदारांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपीविरुद्ध फसवणूक, जबरदस्ती, धमकी व विश्वासघात यांसारख्या गंभीर गुन्ह्यांखाली तत्काळ गुन्हा नोंदवण्याची मागणी केली आहे. तसेच, संबंधित देशी दारू दुकान व मालमत्ता पुन्हा कुटुंबाच्या ताब्यात देण्यात यावी आणि वृद्ध आईसह कुटुंबाला पोलीस संरक्षण देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणाची दखल घेऊन वरिष्ठ पातळीवरून चौकशी होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, केज पोलीस प्रशासनाकडून पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

----------------------

**भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष हाजी एजाज देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण**

कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि.२६ मार्च रोजी दुपारी २ वाजता हॉटेल गोल्डन चॉइस, बार्शी रोड, बीड येथे या शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या शोक सभेला उपस्थित राहून मरहूम हाजी एजाज वहीद देशमुख यांना श्रद्ध

ांजली अर्पण करावी तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी व्हावे, असे आवाहन हाजी एजाज देशमुख मित्रमंडळ बीड व आयोजकांनी केले आहे.

===============

------------------

**घरकुल घोटाळ्यासह इतर ही कोट्यवधींचा 'भ्रष्टाचार'; चौकशीसाठी भाई मोहन**

उपलब्ध करून द्यावीत. रस्ते कामांचा बोगस कारभार: मंगळवार पेठ कॉर्नर ते आंबेडकर चौक या कामासाठी मंजूर ८० लाख ६० हजार रुपयांचा निधी काम न करताच उचलला गेल्याचा आरोप आहे, त्याची सखोल चौकशी व्हावी. दलित वस्ती सुधार योजना: फुलेनगर रस्त्यासाठी मंजूर १ कोटी ६३ लाख ६३ हजार रुपयांच्या कामाची गुणवत्ता तपासण्यात यावी, तसेच सभागृहासाठीच्या निधीचा विनियोग तपासला जावा. ऋक्षपशीरश्र खाते तपासणी: २०१९ ते २०२६ या काळात नगरपंचायतीच्या 'जनरल खात्यातून' झालेला सर्व खर्च सार्वजनिक करावा. शाळेची जागा व नाहरकत प्रमाणपत्र: जिल्हा परिषद माध्यमिक शाळेच्या जागा हस्तांतराचा ठराव रद्द करावा आणि वाईन शॉपसाठी नियमबाह्य 'ना हरकत' प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. उच्चस्तरीय चौकशी समिती: २०१५ ते २०२६ या कालावधीतील सर्व भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी. प्रशासकीय यंत्रणा सतर्क

भाई मोहन गुंड यांनी २७ मार्च रोजी सकाळी ११ वाजेपासून सुरू होणाऱ्या या आंदोलनाची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली आहे. जोपर्यंत ठोस चौकशीचे आदेश मिळत नाहीत आणि दोषींवर कारवाई होत नाही, तोपर्यंत मागे न हटण्याचा पवित्रा त्यांनी घेतला आहे. या आंदोलनामुळे नगरपंचायतीच्या गोटात मोठी खळबळ माजली असून, केज शहरातील नागरिक याकडे मोठ्या आशेने पाहत आहेत. पात्र लाभार्थ्यांचे पैसे हडप करणे आणि कागदावर रस्ते दाखवून निधी लाटणे हा जनतेच्या पैशांचा द्रोह आहे. जोपर्यंत या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लागत नाही, तोपर्यंत हे अन्नत्याग आंदोलन सुरूच राहील.

– भाई मोहन गुंड (नेते, शेकाप)

**जयगाव शिवारातून ८ शेतकऱ्यांच्या पानबुडी मोटारी लंपास**

आहे लक्ष्मण शेंडगे (७.५ क्ष) – २४,००० रुपये विजयकुमार गडदे, व्यंकटेश करे, अदिनाथ मिसाळ, आसाराम शिंदे (प्रत्येकी ५ क्ष) – प्रत्येकी १२,००० रुपये संतोष शिंदे, सय्यद दगडू, फेरोजखान पठाण आणि राजेभाऊ मिसाळ यांच्याही ५ क्ष च्या मोटारी चोरीला गेल्या आहेत.पोलिसांनी या प्रकरणी (१)अर्जुन शिवदास बडे (वय २० वर्ष ) (२) शेख नेहाल (वय १९ वर्ष) (३) योगेश पंडीत (वय २१ वर्ष) आणि दोन अल्पवयीन मुलांसह भंगार खरेदी करणारा दुकानदार समीर शेख (रा. सिरसाळा) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी कारवाई दरम्यान चोरीसाठी वापरलेली सिल्व्हर रंगाची स्विफ्ट कार (क्र. चक–१४–ऊन्ञ–५४६१) जप्त केली असून तिची किंमत साधारण २,७०,००० रुपये आहे. या प्रकरणी गुन्हा (रजि. नं. ७९/२०२६)

भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२), ३१७ (२) आणि ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सपोनि दहिफळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राठोड या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

--------------------

**मीना बाजारात मुलींना त्रास देणाऱ्या टवाळखोरांवर पीएसआय पल्लवी जाधव यांच्या**

करण्यात आली. सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत कावत सर, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली झडख पल्लवी जाधव, सहायक फौजदार मीरा रेडेकर, पोलीस हवालदार शोभा जाधव, चालक पोलीस शिपाई अक्षय जाधव सर्व दामिनी पथक बीड यांनी केली.

## विद्यार्थ्यांसाठी केलेली गुंतवणूक भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची – पद्मश्रीताई धर्माधिकारी

# डॉ. आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने नगरसेविका कविता इंगळे यांच्याकडून वाचनालयास पुस्तके भेट

परळी (आरंभ वृत्तसेवा):- विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थ्यांसाठी केलेली गुंतवणूक भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन परळीच्या नगराध्यक्षा सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी केले.त्या डॉ.भालचंद्र वाचनालयासाठी नगरसेविका कविता अनंत इंगळे यांच्यावतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभ्यासिकेसाठी स्पर्धा पुस्तके भेट देण्यात आली.त्या स्विकारतांना त्या बोलत होत्या.

नगरसेविका सौ .कविता अनंत इंगळे यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ जयंती निमित्ताने परळीचे वैभव असलेल्या डॉ.भालचंद्र वाचनालयातील स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात आलेल्या अभ्यासिकेसाठी स्पर्धा परीक्षा पुस्तके भेट दिली. ही पुस्तके नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे, ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड, पत्रकार अनिरुद्ध जोशी,शंकरराव साळवे,



सामाजिक कार्यकर्ते नवनाथ दाने यांच्या हस्ते मुलांना अभ्यासासाठी देण्यात आली. याप्रसंगी नगराध्यक्षा सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी उपस्थित विद्यार्थी, विद्यार्थ्यानिंना मार्गदर्शन केले.तसेच वाचनालय आणि अभ्यासिकेसाठी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देऊ असे आश्वासन दिले.याप्रसंगी रानबा गायकवाड यांनी नगरसेविका कविता अनंत इंगळे यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दिलेल्या पुस्तकांविषयी आणि बाबासाहेबांच्या ग्रंथ प्रेमाबद्दल माहिती दिली.याप्रसंगी अशोक दहिवडे, पत्रकार महादेव गिते, जयराम गोंडे, रावसाहेब जगतकर यांच्यासह विद्यार्थी ,विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मतदार मॅपिंगसाठी वाढीव कार्यमुक्ती द्या लोकविकास महाआघाडीची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



अंबाजोगाई (आरंभ वृत्तसेवा):- केज विधानसभा मतदारसंघातील बूथस्तरीय अधिकाऱ्यांना (बीएलओ) मतदार मॅपिंगच्या कामासाठी १० दिवसांची वाढीव कार्यमुक्ती द्यावी, अशी मागणी लोकविकास महाआघाडीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात सोमवार (दि. २३ मार्च) अंबाजोगाईच्या उपजिल्हाधिकाऱ्यां मार्फत बीड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. लोकविकास महाआघाडीचे नेते राजकिशोर मोदी यांनी या संदर्भात माहिती देताना सांगितले की, केज विधानसभा मतदारसंघात मतदार यादी अद्ययावत करणे आणि मॅपिंगचे महत्त्वाचे काम सुरू आहे. हे राष्ट्रीय काम १०० टक्के पूर्ण करण्यासाठी बीएलओंना त्यांच्या मूळ विभागातून सुट्ट्यांचा अडथळा: १० दिवसांपैकी गुढीपाडवा आणि रविवार अशा दोन सुट्ट्या आल्याने प्रत्यक्ष कामासाठी केवळ ८ दिवस मिळाले. रमजान महिना: मुस्लिम समाजातील मतदारांचा पवित्र रमजान महिना सुरू असल्याने आणि नागरिक उपासनेत असल्याने माहिती संकलनात अडचणी आल्या. जागरूकतेचा अभाव: सामान्य मतदारांमध्ये मॅपिंगबाबत पुरेशी जनजागृती नसल्याने गोंधळाचे वातावरण आहे, तसेच २००५ च्या याद्या सहज उपलब्ध नाहीत. आणखी १० दिवसांची कार्यमुक्ती मिळणे आवश्यक आहे. या निवेदनावर माजी आमदार पृथ्वीराज साठे, गटनेते सय्यद ताहेरभाई, ज्येष्ठ नगरसेवक हाजी इस्माईल गवळी, सुनील जगताप महेंद्र निकाळजे, भीमराव सरवदे, राजेश वाहुळे अशोक पालके आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मावलाई श्री राज्यस्तरीय समाजसेवा पुरस्कार डॉ. गणेश ढवळेंना जाहीर

बीड (आरंभ वृत्तसेव):- - गेवराई तालुक्यातील मावलाई युवक क्रीडा मंडळ व व्यायाम शाळा ब-हाणपुर यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या १७ वर्षांपासून मावलाई देवी यात्रेनिमित्त पत्रकारिता, सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना मावलाई श्री राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येतो.



यावर्षी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांना मावलाई श्री समाजसेवा पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील मूलभूत सुविधा, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न, वृक्षारोपण व संवर्धन तसेच पर्यावरण संरक्षण यांसारख्या विविध सामाजिक विषयांवर सातत्याने अनोख्या आंदोलनांच्या माध्यमातून शासन दरबारी पाठपुरावा केल्याबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा ब-हाणपुर येथे दि. ०३ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आला आहे. यावेळी शशिकांत शिंगारे यांच्या हस्ते रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात येणार आहे. ार्यक्रमास प्रमोद कुलकर्णी, दिनेश लिंबेकर, सुशील देशमुख, अविनाश वाघिरकर, धनंजय बजगुडे तसेच सहाय्यक निबंधक सहकारी संस्था बीड आर. एम. मोटे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. ह्रकार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सरपंच पाडळशिंगी रितेश साबळे, मंडळ अध्यक्ष विष्णू यादव, सचिव भागवत वराट, पांडुरंग पवार, संतोष वराट यांनी केले आहे. दरम्यान, हा राज्यस्तरीय सन्मान जाहीर झाल्याबद्दल डॉ. गणेश ढवळे यांच्यावर सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# चाटे पब्लिक स्कूल येथे आनंदनगरी उत्साहात संपन्न



धारूर (आरंभ वृत्तसेवा):- धारूर येथील गोपाळपूर रोडवरील चाटे पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज धारूर या ठिकाणी बाळ मेळावा (आनंद नगरी) मोठ्या उत्साहात पडली. शैक्षणिक दृष्ट्या अग्रेसर असणारी शाळा चाटे पब्लिक स्कूल यामध्ये विविध प्रकारचे उपक्रम राबवले जातात याही वर्षी चाटे पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज तर्फे बाल मेळावा आनंद नगरीचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले होते व यामध्ये सर्व बालगोपाळांनी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. आनंद नगरीच्या औचित्य साधून शालेय शैक्षणिक क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण देखील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांना आर्थिक ज्ञान व व्यवहार कसा करायचा याबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव राजेभाऊ चाटे यांनी विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले. तसेच चाटे पब्लिक स्कूलचे आधारस्तंभ स्वप्नील चाटे यांनी देखील शालेय शैक्षणिक क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यासाठी मान दिला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी चाटे पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका शिल्पा मुंडे व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# डॉ स्वरुपसिंह हजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महा अभियान



किल्ले धारूर (आरंभ वृत्तसेवा):- येथे सुजान लॉन या ठिकाणी भारतीय जनता पार्टी चे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी नगर अध्यक्ष डॉ स्वरुपसिंह हजारी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महा अभियान २०२६ घेण्यात आला तसेच प्रदर्शनी उद्घाटन करून नाशिक येथील प्र-कुलगुरू प्रा डॉ जोगेंद्रसिंह बीसेन सर हे प्रशिक्षक महाअभियान साठी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते या शिबिर मध्ये कार्यकर्ते कसा असावा देश भक्ती प्रामाणिकपणा पक्षा विषयी कार्यकर्ता ची निष्ठा कशी असावी राष्ट्र प्रथम नंतर पक्ष शेवटी स्वत: ही संकल्पना घेऊन कार्यकर्ता हीच संकल्पना आहे तसेच दीनदयाल उपाध्ये यांचा विषयी सविस्तर मार्गदर्शन प्रा डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन यानी सांगितले त्या नंतर १ते ३ वाजेपर्यंत कार्यकर्ते यांच्या साठी भोजन व्यवस्था करण्यात आली होती व दुपारच्या सत्रामध्ये भारतीय जनता पार्टी चे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी नगर अध्यक्ष डॉ स्वरुपसिंह हजारी साहेब यांनी जनकल्याणकारी योजना पक्ष विषयी असलेले आपले विचार पक्षातील संघटन व पंडित उपाध्ये यांच्या जीवन कार्याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले तसेच जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी अप्पा मुंडे जिल्हा सचिव ड बालासाहेब चोले व भाजपा तालुका अध्यक्ष संदीप काचगुंडे शहर अध्यक्ष दत्ताभाऊ धोत्रे भाजपा युवा मोर्चा शहर अध्यक्ष ड मोहन भोसले भाजपा तालुका सरचिटणीस रोहनसिंह हजारी तालुका सरचिटणीस रामप्रभू मुंडे यांनी शिबिरामध्ये कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले कार्यक्रम साठी परिश्रम घेतले या वेळी भारतीय जनता पार्टी चे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा मा.नगरअध्यक्ष डॉ स्वरुपसिंह हजारी साहेब, माजी नगर अध्यक्ष उत्तम भाऊ तोष्णीवाल, जिल्हा सचिव अशोक करे,भाजपा गटनेते सारिका ताई सीरसट, नगर सेविका निर्मला काकू नेहरकर, नगर सेविका तथा भाजपा महिला तालुका अध्यक्ष माधुरीताई लोकरे, नगर सेवक बालाजी चव्हाण, नगर सेवक रोहितसिंह हजारी, नगर सेवक विनायक दादा शिनगारे, भाजपा तालुका अध्यक्ष संदीप काचगुंडे,शहर अध्यक्ष दत्ता भाऊ धोत्रे, भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष ज्ञानोबा बडे, भाजपा युवा मोर्चा शहर अध्यक्ष ड मोहन भोसले, तालुका सरचिटणीस रोहनसिंह हजारी, तालुका उपाध्यक्ष बाळासाहेब खामकर, उपाध्यक्ष ड नवनाथ पांचाळ, युवा नेते प्रदीप नेहरकर, ज्येष्ठ नेते माणिकराव लोखंडे,युवा नेते राम लोखंडे, साहेबराव चव्हाण,दादासाहेब घोळवे, रमेश नाना मुंडे, बाळासाहेब सोनटक्के,सुरेश लोकरे,सचिन दुबे, एजाज भाई, धनंजय नागरगोजे, मनोहर मामा तिवारी,रामदास काका गायकवाड,संदीप भैया शिनगारे, रुपेश जी चीद्रावार,माजी सरपंच तुकाराम महाराज तिडके,युवा नेता गोरख पुरने, युवा नेते बाळराजे लगड़,मोबिन शेख, नदीम भाई,राधाकृष्ण चोले, इम्रान कादरी, प्रदीप पुजदेकर, रामेश्वर गवळी,नारायण वडगांवकर, अशोक धुमाळ, भारत वाव्हळकर, गोविंद तोंडे, बालाजी नागरगोजे,सर्व पदाधिकारी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते

# महालोकप्रियता जनसेवा पुरस्काराने शिवाजी दादा ठोंबरे सन्मानित



केज (आरंभ वृत्तसेवा):- पुणे येथे साप्ताहिक महालोकप्रियता या वृत्तपत्राचा भव्य प्रकाशन सोहळा व स्टार २४ न्यूज मराठी चॅनेलचा ५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्रातील विविधक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांना विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.त्यात बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र उंदरी ता.केज येथील शिवाजी दादा ठोंबरे यांना महालोकप्रियता जनसेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला.आपल्या समाजाप्रती असलेल्या निस्वार्थ सेवाभाव,कर्तव्य निष्ठा व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय प्रेरणादायी कार्याबद्दल महालोकप्रियता जनसेवा प्रेरणा पुरस्कार -२०२६ देऊन सन्मानित करण्यात आले आहे. छावा मराठा संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे, महिलांचे,वंचित घटकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.त्यांच्या या कामाची दखल घेऊन महा लोकप्रियता वृत्तपत्राचे संपादक संतोष गोतावळे व सहसंपादक दत्तात्रय मुजमुले यांनी जनसेवा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला आहे.त्यांना मिळालेल्या पुरस्कारा बद्दल राजकीय, सामाजिक मंडळी, मित्रपरिवार,नातेवाईक यांच्यासह सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# महालोकप्रियता वृत्तपत्राचा भव्य प्रकाशन सोहळा व स्टार २४ न्यूज मराठी चॅनेलचा ५ वा वर्धापन दिन संपन्न



केज (आरंभ वृत्तसेवा):- पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्टार २४ न्यूज मराठी चॅनेलचा ५ वा वर्धापन दिन आणि महालोकप्रियता वृत्तपत्राचा भव्य प्रकाशन सोहळा पुणे येथील पावन भूमीत विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. पत्रकारिता क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत डिजिटल मीडियासोबत प्रिंट मीडियामध्येही महालोकप्रियता वृत्तपत्राचे पदार्पण करण्यात आले. स्टार २४ न्यूज मराठी चॅनेलने गेल्या पाच वर्षांमध्ये समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडत पत्रकारितेच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य केले आहे. या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. त्यात मनिषा ताई घुले, महिला सक्षमीकरण प्रेरणा पुरस्कार,शिवाजी ठोंबरे जनसेवा प्रेरणा पुरस्कार, हभप. शेळके, अध्यात्मिक प्रेरणा पुरस्कार, कृष्णा मारोतराव बागल, शैक्षणिक प्रेरणा पुरस्कार, अमोल जयराम कस्तुरे, आकाश बालाजी पांचाळ, युवा उद्योजक्ता प्रेरणा पुरस्कार यांना महा लोकप्रियताचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी संपादक संतोष गोतावळे व सहसंपादक दत्तात्रय मुजमुले यांच्या महालोकप्रियता वृत्तपत्र व स्टार २४ न्यूज मराठी चॅनेलच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत समाजाभिमुख पत्रकारिता अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या वतीने विविध कार्यक्रम संपन्न

केज (आरंभ वृत्तसेवा):- आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण,आनंदगांव ता. केज.जि.बीड च्या वतीने दिनांक २४ मार्च २०२६ रोजी जागतिक क्षयरोग दिन जाणीव - जागृती घेऊन साजरा करण्यात आला.दिनांक २३ मार्च २०२६ रोजी जागतिक हवामान दिन साजरा करण्यात आला.दिनांक २२ मार्च २०२६ रोजी जागतिक जलदिन साजरा करण्यात आला. दिनांक २१ मार्च २०२६ रोजी जागतिक वनदिन साजरा करण्यात आला. हे सर्व कार्यक्रम स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगाव ता.केज जि. बीड येथील वाचन कक्षात आले.या विविध कार्यक्रम प्रचार - प्रसार, जाणीव - जागृती, परिसंवाद,चर्चासत्र, पथनाटय,व्याख्यान व इतर विविध उपक्रम राबवून लोकांमध्ये वरील संदर्भीय विविधविषयांची जाणीव - जागृती होऊन लोकचळवळ उभा रहावी व क्षयरोग निमूलन व्हावे, बदलत्या हवामानानुसार पिकपाण्यात बदल करता यावा,पाण्याचे महत्व कळावे व पाण्याचा वापर काटकसरीने करावा तसेच आपल्या शेतातील झाडांचे जतन,संवर्धन करावे, झाडे तोडू नयेत अशा विविध विषयांची जागृती व्हावी हा उद्येश समोर ठेवून हो विविध उपक्रम राबविण्यात आले.या विविध उपक्रमात,युवक,शेतकरी,शेतमजूर,जेष्ठ नागरीक, विद्यार्थी यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला.संस्थेचे संस्थापक कार्यवाह, जेष्ठ समाजसेवक व जेष्ठ विचारवंत वसुदेव बप्पा गायकवाड,माजी सरपंच रामराजे गायकवाड, नारायण भाऊ गायकवाड,बाळासाहेब गायकवाड,अरुण गायकवाड,एस.के.वैरागे, वेदिका गायकवाड,श्रद्धा गायकवाड,शिवतेज गायकवाड,आनंद भैय्या गायकवाड,यशवंत सौदागर,समर्थ गायकवाड,विक्रम गायकवाड,सुभाष गायकवाड,बालाजी टिंगरे,श्रुती पुंड,ज्ञानेश्वरी पुंड,रावसाहेब जाधव यांच्यासह मोठया संख्येने लोकसहभाग होता.



# गृहरक्षक दलाच्या महिला सुनंदा मोहिते सेवा निवृत्त निरोप समारंभ

माजलगाव (आरंभ वृत्तसेवा):- गृहरक्षक दलाच्या महिला नंदा मोहिते सारजेंट मेजर ह्या बुधवार २५ मार्च रोजी सेवा निवृत्त झाल्या सेवानिवृत्ती बदल त्यांचा सत्कार सुनिता भोसले व सौ छाया बंडू कुलथे आणि जि स तथा अपर पो अधिक्षक आयुष नोपाणी भा पो से व ता स अँड मोरे केंद्र नायक राजेंद्र शेळके प्रशासकीय अधिकारी किशोर राठोड प्लांटून कमांडर बी जी कुलथे व आंभूरे यांनी त्रेमासिक संमेलन मध्य भव्य दिव्य सत्कार करण्यात आला नंदा मोहिते आणि सुनिता भोसले यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील गृहरक्षक दलाचे जवानांना सुखसोयी मिळाव्यात म्हणून वेळोवेळी समंदीत खात्याचे मंत्री महोदया कडे मागण्याचा आतापर्यंत पाठपुरावा केला तसेच कुणाच्या पण सुखदुःखात त्यांचे आणि सुनिता भोसले चे खूप मोठे मोलाचे योगदान असुन सुनिता पवार आणि सुनंदा मोहिते यांनी वेळप्रसंगी स्वतः च्या तब्येतीची काळजी न करता महाराष्ट्रातून कुठल्याही जवानांचा नूसता फोन जरी आला तर त्या जात होत्या मोहिते मॅडम यांचे सेवानिवृत्ती बदल दुरध्वनी वरुन परतूर चे ता स सिताराम काकडे माजलगाव चे ता स मानिराव पांचाळ



पलटून कमांडर बाबासाहेब कुलथे विवेक प्रभाकर काळे संभाजी नगर कोमल कुमावत नांदगाव प्रकाश बताडे संभाजी नगर केशव मुंडे उशा जाधव पाथरी सुग्रीव घूले सोनाली शेप परळी केंद्र नायक सुरेंद्र जव्हेरी सि ए घोलप सखाराम धनवे बालासाहेब निर्मळ बीड यांनी त्यांना पुढील कार्यास वेळेअभावी दुरध्वनी वरुन शुभेच्छा दिल्या असून मोहिते आणि भोसले मॅडम यांनी मनोगत व्यक्त करते वेळी सांगितले की शेवटच्या श्वासापर्यंत आम्ही गृहरक्षक दलाच्या जवानांच्या अडिअडचणी सोडवण्यासाठी कार्य करुन समस्या सोडवण्याचा नक्कीच प्रयत्न करु

# आर्थीक फायद्याचे उद्देशाने स्वतःच्या शेतात गांजाचे पिक पिकवणाऱ्या ईसमावर कारवाई


## ताब्यातुन ५.८०० किग्रॅ गांजाची झाडे किंमत १,७४,००० /- रु चा मुद्देमाल जप्त.

गेवराई (आरंभ वृत्तसेवा):- पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी अंमली पदार्थासंबंधी सुरु असलेल्या अवैध धंद्यांवर कडक कारवाई करुन त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत निर्देश दिले होते. त्याप्रमाणे पोलीस स्टेशन गेवराई यांचे पथकास गुप्त बातमीदाराकडुन खबर मिळाली की, सुशी (वडगाव) ता-गेवराई, जि-बीड येथील ईसम नामे भाऊसाहेब तुरुकमारे याने त्याचे स्वतःचे सुशी शिवारातील गट नंबर २३४ मधील शेतीमध्ये ज्वारीच्या पिकामध्ये गांजा



या अंमली पदार्थाच्या झाडांची लागवड केली असल्याची खात्रीशिर माहिती मिळाली होती. त्याआधारे सदर इसमावर छऊझड कायद्यान्वये रेड करणे असल्याने त्यासंबंधी कायदेशीर पुर्तता करुन गेवराई पोलीसांचे पथक हे मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी रवाना झाले होते. मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन गेवराई यांचे पोलीस पथक तसेच कृषी व महसुल विभागाचे कर्मचारी यांचेसह सुशी शिवारातील गट नंबर २३४ मधील शेतात पोहचुन शेतातील ज्वारीच्या पिकाची पाहणी केली असता धाड टाकुन पाहणी केली असता ईसम नामे भाऊसाहेब तात्याबा तुरुकमारे, वय-६० वर्षे रा. सुशी (वडगाव ) ता-गेवराई, जि-बीड याचे मालकीचे शेतातील ज्वारीचे पिकामध्ये गांजा या अंमली पदार्थाची शेतात लावलेली ४२ झाडे मिळुन आल्याने त्याचे ताब्यातुन ५.८०० किग्रॅ गांजाची झाडे किंमत १,७४,०००/- रु चा मुद्देमाल ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन गेवराई येथे आणुन अटक केली आहे. सदर ईसमाविरुध्द छऊझड कायद्यान्वये गुन्हा दाखल करुन गुन्ह्याचा तपास सुरु केला आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि लंके, सपोनि जंजाळ, प्रो. पोउपनि नागरे, गरजे पोलीस अंमलदार देवडे, भिसे, शिंदे, सोनवणे, सांगळे, ओव्हाळ, डोके तसेच फॉरेन्सीक पथक, कृषी व महसुल विभागाचे कर्मचारी यांनी केली.

## भोंदू अशोक खरात प्रकरणावरून अंधश्रद्धेविरोधात कठोर कारवाईची मागणी; 'मअंनिस' बीडचे मुख्यमंत्र्यांना निवेदन



बीड (आरंभ वृत्तसेवा):- नाशिक येथे उघडकीस आलेल्या भोंदू अशोक खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात सुरू असलेल्या अंधश्रद्धा, बुवाबाजी, सत्ता व संपत्तीच्या संगनमतातून होत असलेल्या महिलांच्या शोषणाविरोधात कठोर आणि व्यापक कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (मअंनिस) बीड शाखेने केली आहे. याबाबतचे सविस्तर निवेदन मा. मुख्यमंत्री महोदयांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सादर करण्यात आले. या निवेदनाचे नेतृत्व विवेक वाहिनीच्या राज्य कार्याध्यक्ष प्राचार्य सविता शेटे यांनी केले असून, केवळ अशोक खरात या एका आरोपीपुरते प्रकरण मर्यादित न ठेवता, त्यामागील संपूर्ण रॅकेट व संगनमत उघड करण्याची मागणी करण्यात आली आहे. अंधश्रद्धा, भीती, असुरक्षितता व अज्ञानाचा फायदा घेत 'दैवी शक्ती', 'अध्यात्म' आणि 'फलज्योतिष'च्या नावाखाली महिलांचे व सर्वसामान्यांचे होत असलेले शोषण

पान २ वर...

## धारूरच्या मुख्य मेन रोडवर फळ विक्रेते हातगाड्यानी केले अतिक्रमण ; वाहतुकीला अडथळा



धारूर (आरंभ वृत्तसेवा):- किल्ले धारूर शहरात मुख्य बाजारपेठेतील मेन रोडवरील हातगाड्यांनी फळ विक्रेते , तसेच अनेक वस्तूंची विक्री करणारे बेकादेशीर गाडे धारकांनी मागच्या आणि दिवसापासून अतिक्रमण केले आहे. सार्वजनिक ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज चौक , हनुमान मंदिर या परिसरात मुख्य रोडवरील विनापरवानगी हातगाड्यां धारकांनी व्यवसाय पार रोडच्या मध्य भागात आणल्याने बाजारपेठेत वाहतूक कोंडी वाढली वाढली असून वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. फळगाडे, विविध वस्तू विक्रेते विनापरवानगीने हात गाड्यांनी शहरातल्या मुख्य बाजारपेठेतील मेन रोडवरील पार अतिक्रमण करून व्यापाऱ्यांना व पादचाऱ्यांना नाहक त्रास होत आहे तात्काळ नगरपरिषद ने व पोलीस प्रशासनाने संबंधित बेकादेशीर हातगाडे फाळविक्रेते हातगाड्यांना सूचना करून रोडवरील केलेल्या अतिक्रमण काढण्यास सूचना व बेकायदेशीर लावणाऱ्यावर करावी करावयात अशी मागणी शहरातील सर्वसामान्य नागरिकाकडून होत आहे. विशेषता शहरात आठवड्यातून दोनवेळा बाजार भरला जातो ग्रामीण भागात अनेक नागरिक शहरात येत असतात याच बेकायदेशीर गाडे फळविकर्ते यांच्यामुळे शहरात वाहतूक कोंडी होत आहे तसेच अपघात व सार्वजनिक जागांचा गैरवापर होत आल्याचे चित्र दिसून येत आहे.याच मुख्य रोडवर आठवडी बाजारी सोमवार व शुक्रवार रोजी रस्त्याच्या मध्यमध्येही बेकादेशीर हातगाडे व्यवसाय थाटून मोठी वाहतूकुंडी करत आहेत. यावर तात्काळ नगरपरिषद ने व पोलीस प्रशासनाने

पान २ वर...

## मीना बाजारात मुलींना त्रास देणाऱ्या टवाळखोरांवर पीएसआय पल्लवी जाधव यांच्या दामिनी पथकाकडून कारवाईचा दणका



बीड (आरंभ वृत्तसेवा):- सविस्तर माहिती अशी की, दामिनी पथक प्रमूख पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांना गुप्तबातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मीना बाजारात काही टवाळखोर मुलींना त्रास देत आहेत. त्यावरून दामिनी पथक हे मीना बाजारात दाखल झाले. साध्या वेशात पथक बाजारात गस्त करत असताना काही टवाळखोर मुलींच्या मागे मागे फिरणे, काहीतरी हावभाव किंवा इशारे करताना मिळून आले. त्यांना पोस्टे बीड शहर येथे हजर करून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. तसेच बाजाराच्या बाहेरच्या आवारात ही काही टवाळखोर मिळून आले, त्यांना सर्वांना ताब्यात घेवून पोस्टे शिवाजीनगरला हजर करून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करून त्यांचे समुपदेशनही करण्यात आले आहे. अशा एकूण १९ टवा उखोरांवर मागील चार दिवसात मुंबई पोलीस अधिनियम कलम ११०/११७ अन्वये प्रतिबंध मक कारवाई

पान २ वर...

## बीड जिल्ह्यात सुट्या स्वरूपात पेट्रोल-डिझेल विक्रीवर बंदी



बीड (आरंभ वृत्तसेवा):- आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधनाचा तुटवडा निर्माण होण्याच्या भीतीने सर्वत्र नागरिक पेट्रोल पंपांवर मोठी गर्दी करत आहेत. या पार्श्वभूमीवर, खबरदारीचा उपाय म्हणून बीड जिल्हा प्रशासनाने कॅन किंवा बाटलीमध्ये सुट्या स्वरूपात पेट्रोल आणि डिझेल देण्यास तातडीने बंदी घातली आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी यासंदर्भात अधिकृत परिपत्रक काढून सर्व पेट्रोल पंप चालकांना कडक सूचना दिल्या आहेत.

प्रशासनाने हा निर्णय का घेतला?

प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे की, अनेक ग्राहक भविष्यातील साठवणुकीच्या उद्देशाने बाटल्या आणि कॅनमध्ये पेट्रोल-डिझेल भरून नेत आहेत. इंधनाची अशा प्रकारे असुरक्षित साठवणूक करणे हे सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आणि धोकादायक आहे. कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी हा प्रतिबंधात्मक निर्णय घेण्यात आला आहे. पेट्रोल पंप चालकांना स्पष्ट ताकीद जिल्हा पुरवठा विभागाने जारी केलेल्या आदेशात

पान २ वर...

*माजी सैनिकाच्या कुटुंबावर अन्याय?*

## देशी दारू दुकानावर बळजबरीने ताबा - जीवे मारण्याच्या धमक्या

केज (आरंभ वृत्तसेवा):- केज तालुक्यात एक अत्यंत गंभीर आणि धक्कादायक प्रकार समोर आला असून, माजी सैनिकाच्या कुटुंबाच्या उपजीविकेचा आधार असलेले देशी दारू दुकान बळजबरीने ताब्यात घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

तक्रारदार जयश्री मारुती सोनवणे (वय ४६, रा. केज) यांनी केज पोलीस स्टेशनमध्ये दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे वडील कै. मारुती राणबा सोनवणे हे १९७२ च्या युद्धात देशसेवा करताना बॉम्बहल्ल्यात गंभीर जखमी झाले होते. त्यांच्या त्यागाची दखल घेत शासनाने त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी उङ-




खखख (डखउ छे. २०) अंतर्गत देशी दारूचे दुकान मंजूर केले होते.

वडिलांच्या निधनानंतर हे दुकान त्यांच्या आई बायसकुबाई सोनवणे (वय सुमारे ९० वर्षे) यांच्या नावावर करण्यात आले. कुटुंबातील सर्व वारसदार

पान २ वर...

## बीड शहरात शांततेचा संदेश; रामनवमी व आंबेडकर जयंती पार्श्वभूमीवर शांतता समितीची महत्त्वपूर्ण बैठक



बीड (आरंभ वृत्तसेवा):- बीड शहर पोलीस ठाणे येथे आगामी रामनवमी मिरवणूक तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि सण-उत्सव शांततेत साजरे व्हावेत यासाठी या बैठकीत विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. या बैठकीस पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक खेडकर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तसेच बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी नागरिकांना महत्त्वपूर्ण सूचना देत सणांच्या काळात संयम, सहकार्य आणि परस्पर सलोखा राखण्याचे आवाहन केले. सदरील बैठकीत बीड पोलीस दलातील भागवत सानप, सय्यद शहेंशाह, अभिजीत सानप, शेख शफीक, रणदिवे सह इतर

पान २ वर...

## जयगाव शिवारातून ८ शेतकऱ्यांच्या पानबुडी मोटारी लंपास

### स्विफ्ट कारसह मुद्देमाल जप्त, ६ जणांवर गुन्हा दाखल.



सिरसाळा (आरंभ वृत्तसेवा):- परळी तालुक्यातील जयगाव शिवारात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, कालव्यातील तब्बल ८ ते ९ शेतकऱ्यांच्या पानबुडी मोटारी चोरून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी पाच चोरट्यांसह भंगार खरेदी करणाऱ्या एका दुकानदारावर गुन्हा दाखल केला असून, गुन्ह्यात वापरलेली स्विफ्ट कार जप्त करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मौजे जयगाव येथील शेत गट नं. ६२ मधील कॅनॉलमध्ये शेतकऱ्यांनी आपल्या शेतीसाठी पानबुडी मोटारी बसवल्या होत्या. २१ मार्चच्या रात्री १० ते २२ मार्चच्या सकाळी ६ वाजेच्या दरम्यान, चोरट्यांनी संगणमत करून या सर्व मोटारी आणि वायर चोरून नेल्या. या प्रकरणी विनायक यशवंतराव शिंदे (वय ४५, रा. जयगाव) यांनी सिरसाळा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चोरट्यांनी एकूण १,२१,००० रुपये किमतीच्या मोटारी चोरल्या होत्या. यात प्रामुख्याने खालील शेतकऱ्यांच्या मोटारींचा समावेश

पान २ वर...

## घरकुल घोटाळ्यासह इतर ही कोट्यवधींचा 'भ्रष्टाचार'; चौकशीसाठी भाई मोहन

केज (आरंभ वृत्तसेवा):- केज नगरपंचायतीच्या कारभारावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करत, विविध विकासकामांची उच्चस्तरीय चौकशी करण्याच्या मागणीसाठी शेकापचे नेते भाई मोहन गुंड येत्या २७ मार्चपासून नगरपंचायतीसमोर बेमुदत अन्नत्याग आंदोलन करणार आहेत. घरकुल घोटाळा, रस्त्यांची बोगस कामे आणि निधीचा अपहार अशा विविध मुद्द्यांवरून त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत प्रशासनाला धारेवर धरले आहे.



नेमका प्रकार काय?

सन २०१५ ते मार्च २०२६ या कालावधीत केज नगरपंचायतीमध्ये राबविण्यात आलेल्या विविध योजनांमध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. विशेषतः पंतप्रधान आवास योजनेतील लाभार्थ्यांचे पैसे इतर खात्यांवर वर्ग करणे, रस्ते न बनवता बिले उचलणे आणि कामांची गुणवत्ता निकृष्ट असणे अशा तक्रारींनी केज शहर चर्चेत आले आहे. आंदोलनातील प्रमुख मागण्या: घरकुल घोटाळा (३.६२ कोटी): पंतप्रधान आवास योजनेतील पात्र लाभार्थ्यांच्या हक्काचे ३ कोटी ६२ लाख रुपये हडप करण्यात आले आहेत. ही रक्कम मूळ लाभार्थ्यांना त्वरित मिळावी किंवा त्यांना घरे

पान २ वर...

## भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष हाजी एजाज देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी उद्या बीडमध्ये शोकसभा



बीड ( प्रतिनिधी ) महाराष्ट्र भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष, माजी अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य हज कमिटीचे सदस्य हाजी एजाज वहीद देशमुख यांच्या अकाली निधनाने राजकीय व सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे. एक कर्तृत्ववान, मनमिळावू आणि जनतेशी नाळ जुळवून काम करणारा नेता हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. त्याच अनुषंगाने उद्या गुरुवार दि.२६ मार्च २०२६ रोजी दुपारी २ वाजता बार्शी रोडवरील हॉटेल गोल्डन चॉईस येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. बीड शहरातील रहिवासी असलेले हाजी एजाज देशमुख हे खऱ्या अर्थाने जनसेवक होते. त्यांची साधी राहणी, आपुलकीचा स्वभाव आणि संघटनेप्रती असलेले समर्पण हे सर्वांसाठी प्रेरणादायी ठरले. ते केवळ नेते नव्हते, तर मार्गदर्शक, भाऊ आणि विश्वासू सहकारी म्हणून त्यांनी अनेकांची मने जिंकली होती. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ व त्यांच्या आत्म्यास शांती लाभावी तसेच शोकाकुल कुटुंबीयांना धैर्य मिळावे यासाठी शोकसभा सभा ( कुराणखानी व खिराज-ए-अकीदत )

पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT